पोलीस अधीक्षक कार्यालय, कोल्हापूर
(जिल्हा विशेष शाखा)
दुरध्वनी क्र. ०२३१-२६६५१९११ ई-मेल -dsbkolhapur@gmail.com

क्र. जिविशा/ ब वर्ग / भाविक अहवाल / ३५९२ /२०२५ /८६४६ कोल्हापूर दि. 05 MAY 2025

प्रति,

पोलीस निरीक्षक,
कागल पोलीस ठाणे

**विषय :- 'ब 'वर्ग यात्रास्थळ विकास कार्यक्रम करीता भाविक अहवालाबाबत ...**

**संदर्भ :-** १)शासन निर्णय क्र.तिर्थ वि-२०११/प्रक्र ६५१/ योजना -७ / मंत्रालय, मुंबई,दि.१६/११/१२
२) अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कोल्हापूर यांचेकडील
जा. क्र./कोजिप /बाखा/प्रकल्प-१/ब-वर्ग/०३/२५-२०२६, दि.३०/०४/२०२५

उपरोक्त विषय व संदर्भान्वये कळविणेत येते की, कोल्हापूर जिल्ह्यातील आपले **कागल पोलीस ठाणे हद्दीतील १) मौजे पिराचीवाडी, ता. कागल येथील श्री हनुमान मंदीर व २) मौजे गोरंबे ता.कागल येथील श्री भावेश्वरी देवालय** या धार्मिक स्थळास **ब** वर्ग यात्रा स्थळामध्ये समावेश होणेबाबत शिफारस केलेली असून याठिकाणी एक वर्षामध्ये येणाऱ्या भाविकांची माहिती मिळणेबाबतचे वरील संदर्भ क्र.२ अन्वये पत्र या कार्यालयास प्राप्त झालेले आहे. नमुद तिर्थस्थळाचा सर्व्हे होवुन एक वर्षामध्ये भेट देणा-या भाविकांचा अहवाल मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

**त्या अनुषंगाने प्रभारी अधिकारी यांनी स्वतः लक्ष पुरवून भाविकांचा अहवाल सादर करते वेळी खालीलप्रमाणे नमुद मुद्यांचे अवलोकन करून खात्रीशीर आणि तंतोतंत वस्तुनिष्ठ माहीती सोबत जोडलेले नमुन्याप्रमाणे तयार करावी. तसेच सदरचा अहवाल आपले सही व शिक्क्यासह आपले** उपविभागीय पोलीस **अधिकारी यांचे मार्फतीने या कार्यालयाकडे सादर करावा. सदर अहवालामध्ये विसंगती अथवा त्रृटी असणार नाही याची दक्षता घ्यावी.**

१) गावची एकुण लोकसंख्या २) सदर मंदीराची ख्याती / धार्मीक व पौराणीक दृष्टया मंदीर किती महत्वाचे आहे
३) गावातील मुख्य यात्रेवेळी यापुर्वी पोलीस प्रशासनाकडे बंदोबस्ताची मागणी केलेबाबतचा पाठपुरावा व पोलीस प्रशासनाकडुन किती बंदोबस्त पुरविण्यात आला होता.मागील तीन वर्षाचा गोपनीय अहवाल
३) मुख्य यात्रेवेळी कायदा व सुव्यवस्थेकरीता गावपातळीवर किती ग्रामसुरक्षा रक्षक आहेत अगर कसे ?
४) मंदीर प्रशासनाची व पुजारी तसेच देवस्थान कमिटीची यादी.व मंदीरांचे फोटो
५) गाव पातळीवर मंदीरावरून दोन समाजामध्ये मतभेद आहेत अगर कसे?
६) परिपत्रकाप्रमाणे माहिती तसेच सदर मंदीराचा महसुल पुरावा.व गाववारी नोंद दाखला
७) सदर गावचे ग्रामसेवक अथवा तलाठी यांचा सविस्तर अहवाल स्वाक्षरीसह सादर करावा.
८) सदर अहवालात क वर्ग मंजुरीचा दाखला जोडण्यात यावा

वरील सर्व मुद्दे तसेच शासकीय परिपत्रक क्र म.शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र तिर्थवि-२०११/प्र.क्र.६५ १/योजना-७दिनांक १६/११/२०१२अन्वये शासन निर्णयामध्ये दिले सुचनांचे तंतोतंत पालन करून आपला वस्तुनिष्ठ अहवाल ०७ दिवसात सादर करावा.

टिप :-सोबत प्रस्तावाची झेरॉक्स प्रत जोडलेली आहे.

(प्रविण खानापुरे)
पोलीस निरीक्षक, जिविशा
पोलीस अधीक्षक, कोल्हापूर करीता

प्रत,

उपविभागीय पोलीस अधिकारी, करवीर विभाग

२/-उपविभागीय पोलीस अधिकारी , करवीर विभाग यांनी सदर धार्मिक स्थळास भेट देणाऱ्या भाविकांच्या उपस्थितीचा आपला अभिप्राय या कार्यालयास सादर करावा.

आवक क्र. १००३/२०२५

FASANUTSAV-2019,2020,2021,2022,2023,2024\Jannat (821)2025 FRESH\B VERGWARI-2025\LETTER-2025.docx

कोल्हापूर जिल्हा परिषद, कोल्हापूर.

# कार्यकारी अभियंता ( बांधकाम विभाग )

जि.प. मुख्य प्रशासकीय इमारत, पहिला मजला, नागाळा पार्क,
कोल्हापूर. पिनकोड – 416 003
फोन नं. (0231) 22656083 मेल [illegible]@gmail.com

जावक क्र. कोजिप/बांधा/प्रकल्प-1/ब वर्ग/03/2025-26 दिनांक - 30/04/2025

प्रति,
मा. जिल्हा पोलीस अधिक्षक,
कोल्हापूर.

विषय:- "ब" वर्ग तीर्थक्षेत्र दर्जा घोषित होणेकरीता मौ. पिराचीवाडी ता. कागल येथील श्री. हनुमान मंदिर व मौ. गोरंबे, ता. कागल येथील श्री. भावेश्वरी देवालय या यात्रास्थळाच्या ठिकाणी वर्षभर येणा-या भाविकांच्या संख्येचे प्रमाणपत्र मिळणेबाबत.

संदर्भ :- 1) मा. आ. हसन मुश्रीफ, मंत्री वैद्यकीय शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांचेकडील दि. 21/04/2025 चे पत्र.
2) ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचेकडील शासननिर्णय क्रमांक तिर्थवि-2011/प्र.क्र.651/योजना-7 दि. 16 नोव्हेंबर 2012.

मौ. पिराचीवाडी ता. कागल येथील श्री. हनुमान मंदिर व मौ. गोरंबे, ता. कागल येथील श्री. भावेश्वरी देवालय "ब" वर्ग दर्जा तिर्थक्षेत्र यादीमध्ये समावेश होणेबाबत मा. आ. हसन मुश्रीफ, मंत्री वैद्यकीय शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांनी उपरोक्त संदर्भ क्र. 1 चे पत्राने प्रस्तावित केली आहे. सदर देवालय शासनाकडुन ब वर्ग तीर्थक्षेत्र म्हणुन घोषित होणेसाठी प्रस्ताव सादर होणेकरीता शिफारस केली आहे. त्याकरीतावरील संदर्भ क्र. 2 नुसार प्रस्ताव शासनास सादर करण्यासाठी सदर तिर्थक्षेत्राच्या ठिकाणी वर्षभर भेट देणा-या भाविकांच्या उपस्थितीबाबतचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

सोबत संदर्भिय क्र.1 पत्रांची छायांकीत प्रत जोडली आहे. तरी संदर्भ क्र.2 मधील शासन पत्रातील विहीत नमुन्यात सदर यात्रास्थळाच्या ठिकाणी वर्षभर येणा-या भाविकांच्या संख्येचे प्रमाणपत्र मिळणेविषयी विनंती आहे.

सोबत - संदर्भीय क्र.1 पत्रांची छायांकीत प्रत.

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, कोल्हापूर.

टीप - भाविकांच्या संख्येचे प्रमाणपत्र कार्यालयीन e-Office पत्त्यावर पाठविणेत यावे.